॥ सा विद्या या विमुक्तये ॥
**स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड**
"ज्ञानतीर्थ" परिसर, विष्णुपुरी, नांदेड - ४३१६०६ (महाराष्ट्र)
**SWAMI RAMANAND TEERTH MARATHWADA UNIVERSITY NANDED**
"Dnyanteerth", Vishnupuri, Nanded - 431606 Maharashtra State (INDIA)
Established on 17th September 1994 – Recognized by the UGC U/s 2(f) and 12(B), NAAC Re-accredited with 'A' Grade

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ,नांदेड.

**ACADEMIC (1-BOARD OF STUDIES) SECTION**

**Phone: (02462) 229542**
**Fax : (02462) 229574**
**Website: www.srtmun.ac.in**
**E-mail: bos.srtmun@gmail.com**

**संदर्भ** : शैक्षणिक(१)/बैठक/२०१९–२०/**२००१** **दिनांक** : २५.११.२०१९.

प्रति (यादीप्रमाणे)
१) **मा. अध्यक्ष/सचिव,** सर्व संलग्नित महाविद्यालये, प्रस्तुत विद्यापीठ.
२) **मा. प्राचार्य,** सर्व संलग्नित महाविद्यालये, प्रस्तुत विद्यापीठ.

विषय : मा. कुलगुरू महोदयांच्या अध्यक्षतेखाली दिनांक २८.११.२०१९ रोजी आयोजित प्रस्तुत विद्यापीठाच्या अधिसभा गृहात (Senate Hall) सकाळी ११:०० वाजता सर्व संलग्नित महाविद्यालयांचे मा. अध्यक्ष/सचिव व मा. प्राचार्य यांच्या बैठकीस उपस्थित राहण्याबाबत.

महोदय/महोदया,

वरील विषयानुषंगाने मा. कुलगुरू महोदयांच्या आदेशान्वये आपणास कळविण्यात येते की, मा. कुलगुरू महोदयांच्या अध्यक्षतेखाली दिनांक २८.११.२०१९ रोजी प्रस्तुत विद्यापीठाच्या अधिसभा गृहात (Senate Hall) सकाळी ११:०० वाजता सर्व संलग्नित महाविद्यालयांचे मा. अध्यक्ष/सचिव व मा. प्राचार्य यांच्या बैठकीचे आयोजन केले आहे.

बैठकीत खालील विषयांबाबत चर्चा होणार आहे.

- परीक्षा पेपर तपासणी, परीक्षा निकाल वेळेवर लावणे आणि शिक्षकांचा पेपर तपासण्यात सहभाग.
- स्थानिक चौकशी समिती भेट, संशोधन केंद्र आणि शैक्षणिक व प्रशासकीय समित्या.
- शैक्षणिक बाबींबाबत.
- परीक्षा घेणे, पेपर तपासणे व पेपर मॉडरेशन प्रक्रियेबाबत.
- मूल्यांकन पद्धतीमुळे विद्यार्थ्यांच्या विद्यापीठास होणाऱ्या पुनर्भेटीबाबत.
- नॅक मान्यतेच्या स्थितीबाबत.
- पीएच.डी. संशोधन केंद्रांबाबत.
- राष्ट्रीय सेवा योजना उपक्रम : एक महाविद्यालय व एक गांव दत्तक योजनेबाबत.
- विद्यार्थ्यांना शिक्षित करण्याबाबत.
- परीक्षेच्या सहज व सुरळित आयोजनाबाबत.
- आंतरराष्ट्रीय परिषद व कार्यशाळा यांच्या आयोजनाकरिता आर्थिक मदतीबाबत.
- शिक्षकांची प्रतिनियुक्ती, परीक्षा सहकेंद्रप्रमुख, परीक्षेच्या कामाची कर्तव्ये व कामांबाबत.
- महाविद्यालयांच्या स्वायत्ततेबाबत.

सर्व मा. प्राचार्यांना सदरील बैठकीस उपस्थित राहणे बंधनकारक आहे, कृपया याची नोंद घ्यावी. तसेच मा. प्राचार्यांना विनंतीवजा सल्ला देण्यात येतो की, सदरील बैठकीस त्यांनी स्वत: जातीने उपस्थित राहावे. त्यांच्या प्रतिनिधींना या बैठकीस अजिबात पाठवू नये. महाविद्यालयांच्या मा. संस्थाचालक/सचिव यांना विनंती करण्यात येते की, त्यांनी स्वत: जातीने अथवा प्रतिनिधींमार्फत उपस्थित राहून सहकार्य करावे.

करिता, उपरोक्त बैठकीस वेळेवर उपस्थित राहून सहकार्य करावे, ही विनंती.

आपला विश्वासू,

**टीप** : तीन व्यक्तींनी एकत्रितपणे स्वत:च्या/भाड्याच्या वाहनाने प्रवास केल्यास देयक देय राहील.

स्वाक्षरित/–
**उपकुलसचिव**
शैक्षणिक (१–अभ्यासमंडळ) विभाग

प्रत माहिती तथा योग्य त्या कार्यवाहीस्तव :
१) मा. कुलगुरू यांचे सचिवालय, प्रस्तुत विद्यापीठ.
२) मा. प्र–कुलगुरू यांचे कार्यालय, प्रस्तुत विद्यापीठ.
३) मा. कुलसचिव यांचे कार्यालय, प्रस्तुत विद्यापीठ.
४) मा. संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ, प्रस्तुत विद्यापीठ, यांना विनंती की, त्यांनी आवश्यक त्या तपशिलांसह उपस्थित राहावे.
५) उपकुलसचिव, शैक्षणिक (३–संलग्नीकरण) विभाग, प्रस्तुत विद्यापीठ.
६) उपकुलसचिव, शैक्षणिक नियोजन व विकास विभाग, प्रस्तुत विद्यापीठ.
७) मा. अभियंता, प्रस्तुत विद्यापीठ, आवश्यक त्या कार्यवाहीस्तव.